# विट्गेन्स्टाइनच्या ट्रॅक्टेट्स ग्रंथाचे स्वरूप

**प्रा.डॉ.सचिन खोकले**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
श्री संत जनाबाई शिक्षण संस्थेचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
गंगाखेड जि.परभणी

लुडविग विट्गेन्स्टाइन यांनी ‘ट्रॅक्टेट्स लॉजिको-फिलॉसॉफिकस’ या ग्रंथाचे लिखान पहिल्या महायुध्दाच्या दरम्यान केलेले आहे. १९१८ साली या ग्रंथाचे लिखान पूर्ण झाले. असे असले तरी विट्गेन्स्टाइनच्या विचारांचे अभ्यासक के. सी. पाण्डेय यांच्या मते ‘ट्रॅक्टेट्स’ मधील अनेक विचार हे १९१३ किंवा त्यापूर्वीचे आहेत, असे मानता येते. त्यावेळेस विट्गेन्स्टाइनवर फ्रेगं आणि शोपेनहॉवर यांचा प्रभाव होता. के.टी. फॅन असे म्हणतात की, “Wittgenstein’s early philosophy is represented by the *Tractatus* which he completed before he was thirty years old”[१] असे असले तरी अथक प्रयत्न करुनही विट्गेन्स्टाइन यांना हा ग्रंथ प्रकाशित करता आला नाही. जर्मन भाषेत लिहिला गेलेला हा ग्रंथ बर्ट्रांड रसेल यांच्या प्रयत्नाने १९२१ साली ‘Annalen der Naturphiolosphie’ (एन्नलेन डेर नेचूर फिलॉसॉफी) या जर्मन दार्शनिक पत्रिकेत ‘Logisch–Philosophische Abhandlung’ (लॉजिश्च-फिलॉसॉफिश्च एभान्डलुंग) या नावाने प्रकाशित झाला. सी.के. ऑग्डेन आणि एफ.पी.रॅमसे यांनी या जर्मन ग्रंथाचा सर्वप्रथम इंग्रजी अनुवाद केला आणि ‘Tractatus Logico-Philosophicus’ या नावाने तो नोव्हेंबर १९२२ मध्ये विट्गेन्स्टाइन यांच्या सहमतीने प्रकाशित केला. या प्रथम आवृत्तीच्या संदर्भात विट्गेन्स्टाइन आणि रॅमसे यांनी काही सुधारण करुन त्याची व्दितीय सुधारित आवृत्ती जून १९२३ मध्ये प्रकाशित केली. तसेच डी.एफ. पियर्स व बी. एफ. मैकगुनेस यांनी देखील ‘ट्रॅक्टेट्स’ चा इंग्रजी अनुवाद करुन १९६१ मध्ये तो प्रकाशित केला. याचीच सुधारित व संशोधित आवृत्ती त्यांनी १९७४ मध्ये प्रकाशित केली. या संदर्भात ते म्हणतात, “The present translation was published in 1961, also with the German text. It has now been revised in the light of Wittgenstein’s own suggestions and comments in his correspondence with C.K. ogden about the first translation.”[2]

‘ट्रॅक्टेट्स लॉजिको-फिलॉसॉफिकस’ या ग्रंथाचा हिंदी अनुवाद राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी, जयपूर तर्फे डॉ. राजेन्द्रप्रसाद पाण्डेय यांनी १९७१ साली ‘तर्क एवंदर्शन का विवेचन’ या नावाने प्रकाशित केला.याचीच व्दितीय आवृत्ती १९९४ मध्ये प्रकाशित झाली.

'ट्रॅक्टेट्स लॉजिको-फिलॉसॉफिकस' हा ग्रंथ विट्गेन्स्टाइन यांनी सुत्रात्मक शैलीत लिहिला आहे. ही शैली ख्रिश्चनांचा पवित्र धर्मग्रंथ 'बायबल'च्या शैली सारखी आहे. प्राचीन ग्रीक तत्वज्ञ हेरॅक्लायट्स किवा आर्वाचीन जर्मन तत्त्वज्ञ फ्रेडरिक नीत्शे यांच्या लिखाणाची शैली देखील अशीच आहे. या ग्रंथामधल्या सूत्रांना विट्गेन्स्टाइन यांनी जे क्रमांक दिलेले आहेत ते दशांश पध्दतीचे आहेत. ते क्रमांक त्या-त्या सूत्रामधल्या विचाराचा टप्पा दर्शवितात. आरंभीच्या सूत्राचा आशय नंतरच्या सुत्रांत टप्प्या-टप्प्याने विशद करीत वाढवीत नेलेला आहे. आरंभीच्या सूत्रातील विचारांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न नंतरच्या सुत्रांत केलेला दिसून येतो. सूत्र १.१, १.२ हे सूत्र क्र.१ वर टिप्पणी आहेत. सूत्र २.१,२.२ हे सुत्र क्र.२ वर टिप्णी असून त्यात सूत्र क्र.२ चे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केलेला आहे. एवढेच नाही तर जे सूत्र टिप्पणी म्हणून देण्यात आलेले आहे, त्या टिप्पणीवर आणखी टिप्पणी म्हणूनही अनेक सूत्र देण्यात आलेले आहेत. जसे की, सूत्र १.११, १.१२ हे सुत्र क्र. १.१ वर टिप्पणी आहेत. के.सी. पाण्डेय यांच्या मते,"दशमलव प्रणाली का प्रयोग, प्रतिज्ञप्तियों को उनकी महत्ता के अनुसार, क्रमबध्द करने के लिए किया गया है।"[3] अशा प्रकारे 'ट्रॅक्टेट्स'मधील सुत्रांमध्ये चढत्या श्रेणीने विचारांची तपशीलवार अभिव्यक्ती केलेली आहे.

'ट्रॅक्टेट्स' या ग्रंथाची पध्दती सूत्रात्मक आहे. संपूर्ण ग्रंथ सात प्रमुख सुत्रांमध्ये विभाजित करण्यात आलेला आहे. या ग्रंथातील हे सात सूत्र म्हणजे सातशीर्षक आहेत. 'ट्रॅक्टेट्स'मधील सात प्रमुख सूत्रे खालीलप्रमाणे आहेत.

1. The world is all that is the case.

(जग हीच संपूर्ण वस्तुस्थिती आहे.)

2. What is the case - a fact - is the existence of states of affairs.

(वस्तुस्थिती काय आहे?अणुपरिमाणी तथ्यांचे अस्तित्त्व आहे.)

3. A logical picture of facts is a thought.

(तथ्यांचे तार्किक चित्र म्हणजे विचार होय.)

4. A thought is a proposition with a sense.

(विचार म्हणजे एक सार्थ विधान असते.)

5. A proposition is a truth-function of elementary propositions.

(An elementary proposition is a truth-function of itself. )

[(विधान हे प्राथमिक विधानांचे सत्यता-फलन असते.)

( प्राथमिक विधान हे स्वतःचेच सत्यता-फलन असते.)(

6. The general form of a truth-function is $[\bar{p}, \bar{\xi}, N(\bar{\xi})]$.

This is the general form of a proposition.

(सत्यता-फलनाचे सामान्यरुप $[\bar{p}, \bar{\xi}, N(\bar{\xi})]$.असे असते. हे एका विधानाचे सामान्यरुप आहे.)

7. What we cannot speak about we must pass over in silence.

(ज्या विषयी काही सांगता येत नाही त्याविषयी मौन बाळगले पाहिजे.)

अशा प्रकारे केवळ सात प्रमुख सूत्रे आणि त्यांची काही उपसूत्रे आणि ८० पाने, एवढा आकाराने हा ग्रंथ लहान असला तरी तो आकलन करण्यास अतिशय दुर्बोध समजला जातो. 'ट्रॅक्टेट्स' मध्ये विट्गेन्स्टाइनचे मुख्य उद्दिष्ट हे तत्त्वज्ञानात्मक प्रश्न भाषेच्या योग्य आकलनाने आणि तिचे तर्कशास्त्र समजल्याने सुटू शकतात, हे दाखविण्याचे होते. ते स्पष्ट करण्यासाठी त्यांनी 'ट्रॅक्टेट्स'मध्ये भाषेचे स्वरुप आणि तिचा जगाशी असलेला संबंध हया गोष्टीचा प्रामुख्याने विचार केला. हया व्यतिरिक्त तर्कशास्त्राचे स्वरुप, तार्किक आकार, संभाव्यता, विगमन, कारणता, तत्त्वज्ञानाचे प्रयोजन, स्वयमेववाद (Solipsism), नीतिशास्त्राचे प्रश्न, धर्म, जीवन याही विषयासंबंधीचे विवेचन 'ट्रॅक्टेट्स'मध्ये आहे. या ग्रंथाचा उद्देश स्पष्ट करताना या ग्रंथाच्या प्रस्तावनेत विट्गेन्स्टाइन यांनी म्हटले आहे की, "The book deals with the problem of philosophy, and shows, I believe, that the reason why these problems are posed is that the logic of our language is misunderstood. The whole sense of the book might be summed up in the following words: what can be said at all can be said clearly, and what we cannot talk about we must pass over in silence."[4] अर्थात, 'ज्याविषयी काही सांगता येत नाही त्याविषयी मौनच बाळगले पाहिजे' हेच सूत्र साधारणतः ग्रंथात मध्यवर्ती आहे. आणि what can be said व What cannot be said but shownया विषयीचे विवेचन हाच या ग्रंथाचा गाभा आहे.

संदर्भः

१) के. टी. फॅन, विट्गेन्स्टाइन्स कॉन्सेप्शन ऑफ फिलॉसॉफी, ऑक्सफर्ड बेसील ब्लॅकवेल,१९६९, पृ.३४

२) लुडविग विट्गेन्स्टाइन, ट्रॅक्टेट्स लॉजिको-फिलॉसॉफिकस, अनुवादः डी. एफ. पिअर्स अँड बी. एफ. मॅकगुनीज, रूटलेज अँड केगन पॉल, लंडन,१९७४, पृ.V

३ ) काली चरण पाण्डेय, विट्गेन्स्टाइन के दर्शन की रुपरेखा, न्यू भारतीय बुक कॉरपोरेशन, दिल्ली,२००५, पृ. ३६

४) लुडविग विट्गेन्स्टाइन, उपरोक्त, पृ.०३